# समर्पण

तीर्थरूप सौ. आई व बापू यांना.........

# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंधिका पूर्ण होताना कर्तव्यपूर्तीच्या भावनेने मनाला समाधान वाटत असून या प्रसंगी अनेकांचे माझ्यावरील उपकारांचे, सहकार्याचे कृतज्ञतेने स्मरण होते.

प्रस्तुत प्रबंधिकेच्या अभ्यासासाठी मार्गदर्शक म्हणून मला शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्राध्यापक आदरणीय गुरुवर्य डॉ. रवींद्र ठाकूर सर लाभले हे मी माझे सद्भाग्य समजतो. काव्यासारखा क्लिष्ट वाङ्मय प्रकार अभ्यासासाठी निवडणे म्हणजे एक आव्हान होते. ते पेलणे आणि पूर्ण करणे यासाठी लागणारी माझ्या मनाची तयारी आणि विचारांची दिशा निश्चित करण्याचे काम सरांनी केले. श्री. ठाकूर सरांनी मार्गदर्शक म्हणून मला जे मार्गदर्शन केले आहे ते माझ्या लेखी खूप उच्च दर्जाचे आहे. सरांनी वेळोवेळी चर्चा करताना मला बारीक तपशीलही समजावून दिले. प्रबंध अधिकाधिक अर्थपूर्ण व नेमका होण्यासाठी त्यांनी महत्त्वाच्या सूचना केल्या. त्या मला अभ्यासात उपयुक्त ठरल्याच पण त्या मला पुढील अभ्यासात आणि आयुष्यात मोलाच्या ठरणाऱ्या आहेत. डॉ. ठाकूर सरांचा मी शतशः ऋणी आहे.

तसेच मराठी विभागातील विभाग प्रमुख आदरणीय प्रा. डॉ. कृष्णा किरवले सर आणि प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे सर यांचेही वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी मला प्रेरणा देणारे व वेळोवेळी सहकार्याचा हात पुढे करणारे वनस्पतीशास्त्र विभागातील आदरणीय प्रा. डॉ. जी.बी दीक्षित सर व स्वर्गीय प्रा. डॉ. टी. एम. पाटील सर यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. त्याचप्रमाणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस, या कॉलेजचे आदरणीय प्रा. पार्लेकर सर, प्रा. व्ही.बी. पाटील सर, प्रा.शेषभरे सर, तसेच माझ्या गावचे स्वातंत्र्य सैनिक श्री आबा दादा पाटील यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यापेक्षा मी त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

माझ्या संशोधन कार्याची सातत्याने सहृदयतेने विचारपूस करुन सदैव प्रोत्साहन देणारे, अडीअडचणीने पांगुळणाऱ्या मनाला उत्साही ठेवणारे, आणि नेहमीच जीवनदायी प्रेरणा देणारे शिवाजी विद्यापीठातील उद्यान विभागातील श्री. डी. एन. कदम साहेब व श्री आर. बी. इंगवले साहेब यांच्या ऋणात राहणे मला आवडेल. तसेच माझ्या संशोधन कामातील कवींची मुलाखत घेण्याच्या वेळी आणि इतर वेळी सहकार्य करणारे, आधार देणारे शिवाजी विद्यापीठातील वरिष्ठ ग्रंथालय साहाय्यक श्री संजय महाजन साहेब यांचाही मी ऋणी आहे.

विद्यापीठ दूरध्वनी विभागातील रावसाहेब माने व गजानन चौगुले यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच विभागातील प्रा. हिमांशू स्मार्त, श्री. विनय पाटील, श्री. सतीश कुसुंबे यांचाही मी मन:पूर्वक आभारी आहे. त्याचबरोबर माझे मित्र सदा पाटील, संतोष कदम तसेच रेखाताई पाटील यांनी आपले मित्रकर्तव्य पार पाडले हेही या ठिकाणी नमूद करणे मला महत्त्वाचे वाटते. ह्या संशोधन कामी आणि माझ्या शैक्षणिक वाटचालीमध्ये नेहमी सुयश चिंतणाऱ्या आणि मित्रकर्तव्याची भूमिका हिरीरीने पार पाडणाऱ्या माझ्या मित्र परिवारामध्ये डॉ. एम. बी. कानडे सर, विनायक केडगे सर, बी.टी. कांबळे सर, चंदर बन्ने, अभिजीत घाडगे, रमेश खबाले, किरण देशमुख, मोहन सदामते, मोहन चव्हाण, शंकर शिंदे, संतोष लोहार, सागर सुर्वे, विजय हिनुगले, शिवाजी माळी, गजानन अपिने, राजेंद्र कुंभार, नवनाथ शिंदे, दिपक घाटगे, मानसिंग दबडे, नवनाथ कीर्दत, राजू जाधव सर आणि अशा अनेक ज्ञात अज्ञात मित्रांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचा अंत:करणापासून आभारी आहे.

माझे थोरले बंधू श्री. धनाजी पाटील, वहिनी सौ. संध्याराणी पाटील, बहीण सौ. बेबीताई (अनिता) यांनी मला समजून घेऊन जास्तीतजास्त समाधान दिले. त्यांच्या प्रेरणेपोटीच मी हे काम पूर्ण करू शकलो, तसेच नातेवाईक श्री. विजय पाटील, दाजी श्री. दत्तात्रय पाटील यांचा सहकार्याचा हात नेहमीच माझ्या पाठीशी राहिला. या सर्वांचे ऋण फेडणे अशक्य आहे म्हणून मी त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. तसेच कु. पूजा, तेजस्विनी, विक्रम, अमोल, अमित, साहील, आरती, वैष्णवी, अजय, अक्षय यांच्या किलबिलाटाने माझे असंख्य ताण सुसह्य झाले व माझे मन नेहमीच उल्हासित राहिले. नाशिक आकाशवाणी केंद्राचे केंद्र संचालक उत्तम कोळगावकर यांनीही आपल्या दैनंदिन कामाच्या व्यापातून वेळ काढून मला मुलाखतीसाठी जो बहुमोल वेळ दिला त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

तसेच ह्या प्रबंधिकेच टंकलेखन बिनचूक, सुबक व वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल श्रीकांत कॉम्प्युटर्स व त्यांचे सहकारी यांचाही मी मन:पूर्वक आभारी आहे.

*आ. शि. पाटील*